**MMRDA Secures USD 12 Billion Investment (rs 103800 crores) with Brookfield for Transformative Infrastructure Projects including Mumbai 3.0**

Historic FDI to Propel MMR Towards Becoming a Global Economic Hub in 5 to 7 years

Mumbai, January 29, 2025:

In a historic move under the visionary leadership of Chief Minister Shri Devendra Fadnavis and the Chairmanship of Deputy Chief Minister Shri Eknath Shinde, the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) has signed a Memorandum of Understanding (MoU) with Brookfield, a leading global investment firm. The initiative was spearheaded by Dr. Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA. The MoU was signed in the presence of Mr. Anuj Ranjan, CEO, Brookfield.

This landmark agreement marks an unprecedented Foreign Direct Investment (FDI) of USD 12 billion (₹103800crore), focusing on transforming the Mumbai Metropolitan Region (MMR) into a Global Economic Hub in 5 to 7 years.

Under the initiative of Dr. Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA has participated in the World Economic Forum (WEF) Annual Summit at Davos for the second consecutive year, securing MoUs worth USD 40 billion. As it celebrates 50 years of planning and infrastructure development, MMRDA continues to attract investments that shape the region's future.

Key Highlights of the MoU

- The collaboration focuses on developing Metro projects, roads, bridges, urban infrastructure, real estate, Transit-Oriented Development (TOD), Land Value Capture opportunities, and sustainable blue and green infrastructure.

- Significant investment will be directed toward Mumbai 3.0 (KSC New Town, spanning 323.24 sq. km.), Special Planning Areas (SPAs) in the northern (1,006.76 sq. km.) and southern (673.33 sq. km.) regions of MMR.

- These projects will include Residential, Commercial, and Mixed-use developments, along with Logistics Parks, Data Centres, and Global Capability Centres (GCCs). The focus will also be on enhancing physical, digital, and social infrastructure.

This initiative will support Maharashtra's ambition to become a USD 1 trillion economy and contribute significantly to India's goal of achieving a USD 5 trillion economy within the next 3–4 years. The MoU is projected to help achieve a USD 300 billion economy within MMR and create 3 million additional jobs by 2030.

About Brookfield

Brookfield, headquartered in Toronto, is a global leader in alternative asset management, wealth solutions, and operating businesses, including real estate, renewable energy, infrastructure, and

business services. With its extensive experience in real estate and infrastructure development, Brookfield is poised to bring strategic investment, financial expertise, and operational excellence to the Mumbai Metropolitan Region.



**मुंबई ३.०चा विकास आणि भविष्यसज्ज पायाभूत सुविधा उभारण्यासाठी एमएमआरडीएने ब्रूकफील्डकडसह केला १२ अब्ज डॉलरची (रु.१०३८०० कोटी) गुंतवणूकीचा सामंजस्य करार**

येत्या ५-७ वर्षात मुंबई महानगर प्रदेश हे जागतिक पातळीवरील आर्थिक केंद्र होण्यास या ऐतिहासिक परकीय थेट गुंतवणुकीमुळे मिळणार चालना

मुंबई, २८ जानेवारी २०२५ :

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या द्रष्ट्या नेतृत्वांतर्गत आणि उपमुख्यमंत्री व एमएमआरडीएचे अध्यक्ष श्री. एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) ब्रूकफील्ड या जागतिक पातळीवरील आघाडीच्या गुंतवणूक फर्मसोबत सामंजस्य करार केला. एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी (भाप्रसे) यांनी या उपक्रमाचे नेतृत्व केले. ब्रूकफील्डचे सीईओ श्री. अनुज राजन यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

या महत्त्वपूर्ण करारांतर्गत १२ अब्ज डॉलरची (₹१,०३,८०० कोटी) अभूतपूर्व परकीय थेट गुंतवणूक (एफडीआय) करण्यात आली असून मुंबई महानगर प्रदेश हे येत्या ५ ते ७ वर्षात जागतिक पातळीवरील आर्थिक केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी या गुंतवणुकीचा वापर करण्यात येणार आहे.

एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी (भाप्रसे) यांच्या पुढाकाराने दावोस येथे आयोजित वर्ल्ड इकोनॉमिक फोरमच्या वार्षिक परिषदेत सलग दुसऱ्या वर्षी एमएमआरडीएने सहभाग घेतला होता. या परिषदेत एमएमआरडीएने तब्बल ४० अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले. एमएमआरडीएच्या स्थापनेचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. नियोजन व पायाभूत सुविधा विकास यात आघाडीवर असलेली एमएमआरडीए आजही या भागातील भविष्य घडविण्यासाठी गुंतवणूक आकर्षित करत आहे.

सामंजस्य करारातील मुख्य मुद्दे :

- मेट्रो प्रकल्प, रस्ते, पूल, शहरी पायाभूत सुविधा, रिअल इस्टेट, ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट (सार्वजनिक परिवहन सेवा केंद्राभोवती केलेली विकास कामे), लँड व्हॅल्यू कॅप्चर संधी (पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे ज्या जमिनीची किंमत वाढते, त्या मूल्यवाढीतून महसूल निर्माण करण्याची प्रक्रिया), शाश्वत ब्लू व ग्रीन पायाभूत सुविधा (जलस्रोतांशी संबंधित आणि पर्यावरणपूरक घटकांशी संबंधित पायाभूत सुविधा) विकसित करण्यावर या सहयोगाद्वारे भर देण्यात येणार.

- मुंबई ३.० (३२३.२४ चौ. किमी क्षेत्रफळात विस्तारलेल्या कर्नाळा-साई- चीरनेर या क्षेत्रांमध्ये प्रस्तावित असलेले मुंबई महानगर प्रदेशातील नवे शहरी विकास प्रकल्प), मुंबई महानगर प्रदेशाच्या उत्तर (१००६.७६ चौ. किमी) आणि दक्षिण (६७३.३३ चौ. किमी) भागात विशेष नियोजन क्षेत्रे (एसपीए) विकसित करण्यासाठी गुंतवणुकीचा मोठा भाग वळविण्यात येईल.

- या प्रकल्पांमध्ये निवासी, व्यावसायिक, मिश्र-वापर विकास प्रकल्प, लॉजिस्टिक्स पार्क, डेटा सेंटर्स, ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स (जीसीसी) यांचा समावेश असेल. तसेच प्रत्यक्ष, डिजिटल व सामाजिक पायाभूत सुविधा विकास करण्यावर भर देण्यात येईल.

या उपक्रमामुळे महाराष्ट्राच्या १ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होण्याच्या महत्त्वाकांक्षेला पाठबळ मिळेल आणि पुढील ३ ते ४ वर्षात ५ ट्रिलियन डॉलरचे अर्थव्यवस्था होण्याच्या भारताच्या महत्त्वाकांक्षेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले जाईल. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशात २०३० पर्यंत ३०० अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था निर्माण होण्यास मदत होईल. तसेच ३० लाख अतिरिक्त रोजगार संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

ब्रूकफील्डबद्दल

ब्रूकफील्डचे मुख्य कार्यालय टोरोंटोमध्ये असून अल्टरनेटिव ॲसेट मॅनेजमेंट, वेल्थ सोल्यूशन्स आणि रिअल इस्टेट, नवीकरणीय ऊर्जा, पायाभूत सुविधा व व्यवसाय सेवा यासारख्या व्यवसायांच्या कामकाजात ही कंपनी आघाडीवर आहे. रिअल इस्टेट आणि पायाभूत सुविधा विकास क्षेत्रात या कंपनीचा व्यापक अनुभव असून मुंबई महानगर प्रदेशात धोरणात्मक गुंतवणूक करण्यास, आर्थिक कौशल्य वापरण्यास आणि उत्कृष्ट कामकाज करण्यास ब्रूकफील्ड सज्ज आहे.